# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 02/07/2020 (गुरूवार)

(सायंकाळ)

## खून

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर मौजा वार्ड क्र. 10, मोवाड येथे दिनांक 01/07/2020 चे 23.30 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) गजेन्द्र उर्फ बडया रघुनाथ बडघरे, वय 58 वर्षे, रा. मोवाड, ता. नरखेड व 2) उमेश उर्फ कुलटा विनोदराव जैन, वय 35 वर्षे, रा. मोवाड, ता. नरखेड यांनी संगनमत करून अज्ञात कारणावरून रामराव महादेव बनाईत(मृतक), वय 52 वर्षे, रा. वार्ड क्र. 10, मोवााड याच्या सोबत भांडण करून काठी व लाकडी दांडयाचा फावडयाने डोक्यावर, हातावर, कपाळावर जबर मारहाण करून जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– यादवराव चंपतराव वाडबुधे, वय 56 वर्षे, रा. पोरगव्हाण ता. वरूड जिल्हा–अमरावती यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 302, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि. मल्लिकार्जुन इंगळे ठाणेदार पो.स्टे. नरखेड मो.नं. 9011901188 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 6 कि.मी. अंतरावरील मौजा खुरजगाव शिवार येथे दिनांक 01/07/2020 चे 06:45 वा. दरम्यान मनोहर महादेव ढोके (मृतक), वय 49 वर्ष, रा. ढालगावखैरी हे त्यांच्या एमएच–40/एक्स–7553 क्रमांकाच्या मोटरसायकलने ढालगावखैरी वरून मंगसा कंपनी येथे जात होते. दरम्यान विरूध्द दिशेने येणारी एमएच–40/एएच–8994 क्रमांकाची ॲक्टीवा गाडीचा चालक आरोपी नामे– रोशन क्षिरसागर, रा. कोराडी नागपूर यांनी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मनोहर ढोके यांच्या डोक्याला जबर मार लाग्ल्याने त्यांचा मृत्यू झाला. तर चालक आरोपी व स्वार गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. सुरेश मट्टामी 7350968100 हे करीत आहे.

# गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत वार्ड क्र. 4 येथे दिनांक 01/07/2019 चे 19:00 वा. पुर्वी अतूल रमेशराव रेवतकर, वय 24 वर्ष, रा. वार्ड क्र. 4 नरखेड (मृतक) हा दि. 30/06/20 रोजी घरून निघून गेला. त्याची मीसींग क्र. 31/20 दि.01/07/20 प्रमाने नोंद आहे. मृतक याने अज्ञात कारणाने नॉययान दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आशीष रमेश रेवतकर, रा. वार्ड क्र.4 नरखेड यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रकाश खोपे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर